प्रेसनोट

दिनांक १७/०२/२०२१

**सपोउपनि इद्रीस हुनुमियाँ बागवान वय ५२ वर्षे नेमणुक पोलीस स्टेशन देवणी जि. लातूर रा. हिंदूस्थान कॉलनी उदगीर जि. लातूर यांनी ४०००/– रुपयांची लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यानी पोलीस स्टेशन देवणी येथे दिलेल्या तक्रार अर्जात मदत करून गैरअर्जदार यांचेवर कारवाई करणेच्या कामासाठी सपोउपनि बागवान ४०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तक्रार दिनांक १७/०२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, लातूर यांचेकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक १७/०२/२०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता सपोउपनि बागवान यांनी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जात मदत करून गैरअर्जदार यांचेवर कारवाई करणेच्या कामासाठी सपोउपनि बागवान यांनी ४०००/– रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालें.

आरोपी लोकसेवक सपोउपनि इद्रीस हुनुमियाँ बागवान यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक १७/०२/२०२१ रोजी देवणी येथील लासोणा चौकात पाठविले असता सपोउपनि बागवान यांनी तक्रारदार यांना ४०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम १९:१४ वाजता पंचांसमक्ष स्वत: स्विकारुन सापळा पथकातील सदस्य समोर येत असल्याचे पाहुन पोलीस निरीक्षक दराडे यांना मोटार सायकलने धक्का देवुन पळुन जावुन लाचेची रक्कम कोठे तरी फेकुन दिलेली आहे.

म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन देवणी येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ व कलम २०१ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दराडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

स्दरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, सपोउपनि/संजय पस्तापुरे, पोह/लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, रमाकांत चाटे, पोना/मोहन सुरवसे, अमोल शिंदे, मपोना/शिवकांता शेळके, पोशि/संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, संदीप जाधव, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप्स असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेडपरिक्षेत्र, नांदेड | :– मोबाईल कमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल कमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल कमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल कमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन कमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन कमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर